लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य कार्यालयातील ४ सदस्यांना कार्यालयीन वापराकरीता एकूण ४ नवीन वाहने खरेदी करण्यासाठी रू.१,३२,१८,७६८/- इतकी रक्कम संक्षिप्त देयकाव्दारे आहरीत करण्यास मंजूरी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एलपीएल-२०२६/प्र.क्र.६३/लोकआ (कार्या-१५)**
६ वा मजला, ६२३ (विस्तार), हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ सप्टेंबर, २०२६

वाचा :- १. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहन -२०२५/प्र.क्र.१९/विनियम, दि.१७.०९.२०२५.
२. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/ विनियम, भाग-२, दि.११.०८.२०२६.
३. प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय यांचे पत्र क्र.आस्था/मा.सदस्यांकरीता नवीन कार/२०२६/१६३३०/२०२६, दि.१९.०८.२०२६.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एलपीएल-२०२६/प्र.क्र.६३/लोकआ, दि.०४.०९.२०२६.
५. प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय यांचे पत्र क्र.आस्था/मा.सदस्यांकरीता नवीन कार/२०२६/१७८७३/२०२६, दि.०८.०९.२०२६.
६. प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय यांचे पत्र क्र.आस्था/मा.सदस्यांकरीता नवीन कार/२०२६/१८०७८/२०२६, दि.१०.०९.२०२६.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ नुसार नियुक्त करण्यात आलेल्या लोक आयुक्त संस्थेतील ४ सदस्यांना कार्यालयीन वापराकरीता ४ नवीन वाहन खरेदीसाठी राज्य वाहन आढावा समितीने दिलेल्या मंजूरीस अनुसरुन, लोक आयुक्त संस्थेच्या सदस्यांना प्रत्येकी रु.३०.०० लक्ष च्या मर्यादेत (सदर किंमत मर्यादेत वस्तु व सेवा कर, मोटार वाहन कर व नोंदणी शुल्काचा अंतर्भाव वगळून) नवीन वाहन खरेदी करण्यास संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संदर्भ क्र.६ अन्वये प्राप्त झालेल्या विनंतीच्या अनुषंगाने लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य या कार्यालयातील लोक आयुक्त संस्थेच्या ४ सदस्यांना कार्यालयीन वापराकरीता एकूण ४ वाहने खरेदी करण्यासाठी एकूण रू.१,३२,१८,७६८/- इतकी रक्कम संक्षिप्त देयकाव्दारे आहरीत करण्यास मंजूरी देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य या संस्थेतील ४ सदस्यांना कार्यालयीन वापराकरीता वाहने खरेदी करण्यासाठी एका वाहनाकरीता वस्तु व सेवा कर, मोटार वाहन कर, नोंदणी शुल्क, Accessories, T Glass (Ceramic Coating) आणि Extended Warranty सह रू.३३,०४,६९२/- प्रमाणे एकूण ४ वाहनांची **[Innova-Hycross (ZX-7S)]** खरेदी करण्यासाठी येणाऱ्या एकूण रक्कम रू.१,३२,१८,७६८/- (अक्षरी रूपये-एक कोटी बत्तीस लाख अठरा हजार सातशे अडुसष्ट फक्त) इतकी रक्कम संक्षिप्त देयकाव्दारे आहरीत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

१) लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी प्रस्तावित वाहने खरेदी करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या वाहन खरेदीसंदर्भातील नियम, शासन निर्णय, परिपत्रके व विहित कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करावे.

२) सदर खर्चाच्या रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास सादर करावीत.

३) शासन परिपत्रक क्र.मुंविनि-२०१७/प्र.क्र.३८/१७/विनियम दि.१८ डिसेंबर, २०१७ मधील सुचनेनुसार “२०७० ००८५, १३-कार्यालयीन खर्च” या लेखाशिर्षाखालील दि.३१.०७.२०२६ यापूर्वीची तपशीलवार देयके प्रलंबित नाहीत, याबाबत खातरजमा करण्यात यावी.

४) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक एक महिन्याच्या आत शासनास सादर करण्याची जबाबदारी लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

३. उपरोक्त खर्च " मागणी क्र. ए-०४, २०७०, इतर प्रशासकीय सेवा-(१०४) दक्षता,(००)(०१) लोक आयुक्त, (अनिवार्य) (२०७० ००८५) १३- कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०२६ - २७ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. या शासन आदेशान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीचे वितरण करण्याकरीता प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी व सचिव (अध्यक्षांचे खाजगी सचिव), लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाकडील अनौ. संदर्भ क्र.५६०/व्यय-४, दि.२१.०९.२०२६ व संदर्भ क्र. २६२/२०२६/विनियम, दि.१८.०९.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९२८१५०७४८९३०७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NEETA EKNATH SHINDE

Digitally signed by NEETA EKNATH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F2BFFD6992498E56663024368C72B33364CFB066D53682C53A425E54D187A7C1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F325D659F47933958AA2D98F394DB95F94BE57548776492BA36E77EA1C4AA53B, cn=NEETA EKNATH SHINDE
Date: 2026.09.28 15:08:51 +05'30'

**(निता शिंदे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,(दोन प्रती)
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १, मुंबई,
३. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १, मुंबई,
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६. वित्त विभाग, विनियम, व्यय -४, अर्थसंकल्प - १९, विनियम, मंत्रालय, मुंबई,
७. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन - २५, मंत्रालय, मुंबई,
८. निवड नस्ती.